नि.दि.दा.क्र. ७५/२०१४
रामभाउ वि. अजाब
नि.क्र. ६९

**<u>वादी साक्षीदार क्र. २ चा पुढील सरतपास वादीतर्फे विव्दान विधीज्ञ, श्री. एन. जी. कांबळे मार्फत शपथेवर सुरु</u> :**

**१.** आता मला माझा नि.क्र. ६९ वरील साक्ष प्रतिज्ञालेख दाखविण्यात आला, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे व तो माझे सांगण्याप्रमाणे लिहीला गेला आहे, त्यावर माझी व वकीलांची सही आहे.

**२.** आता मला आर्टीकल सी वरील मृत्युपत्र दाखविण्यात आले. सदरचे मृत्युपत्र करणारे जानराव जागोजी जंगले यांनी त्यांचा मुलगा रामभाउ जंगले यांना करुन दिलेले आहे. त्यावर माझी साक्षीदार म्हणुन सही आहे. त्यावर दुसरे साक्षीदार म्हणुन सुरेंद्र भिल्लम यांची सही आहे. सदरचे मृत्युपत्र आम्हाला वाचुन दाखविण्यात आले, त्यावर आम्ही सही केली व जानराव जंगले यांचा अंगठा घेतला होता. आर्टीकल सी वरील नमुद असलेल्या मृत्युपत्रास नि. क्र. ७० देण्यात येते.

**<u>प्रतिवादी तर्फे उलटतपास विव्दान विधीज्ञ श्री. एस. पी. लोलुसरे मार्फत शपथेवर सुरु</u> :**

**३.** सदरचे नि.क्र. ७० वरील मृत्युपत्र कोणत्या तारखेला झाले हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदरचे मृत्युपत्र २०१२ साली झाले होते. हे मला सांगता येणार नाही की, नि.क्र. ७० वरील मृत्युपत्रासोबत कोणती कोणती कागदपत्रे जोडली गेली होती. हे मला सांगता येणार नाही की, सदरचे दस्त म्हणजेच मृत्युपत्र किती पानांचे होते. आता मला हे आठवत नाही की, जानराव जंगले यांनी सदरच्या मृत्युपत्रावर किती ठिकाणे अंगठे केले/दिले होते. हे मला माहीत नाही की, सदरच्या मृत्युपत्रामध्ये कोणत्या मालमत्तेचा उल्लेख केला होता किंवा कसे.

४. सदरच्या मृत्युपत्राचा खर्च जानराव जंगले यांनी केला होता. हे म्हणने खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, जानराव जंगले यांनी सदरचे मृत्युपत्र माझेसमक्ष केले होते. हे म्हणने खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, जानराव जंगले यांनी सदरचे मृत्युपत्र मला वाचुन दाखविले होते. जानराव जंगले याचा मृत्यु कोणत्या तारखेला झाला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की, माझे व रामभाउ जंगले यांचे घरोब्याचे संबंध आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला,
फेरतपास : काही नाही.

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

(एन. बी. राठोड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
नरखेड
दि. ०४.०२.२०१९

माझे समक्ष,

(एन. बी. राठोड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
नरखेड
दि. ०४.०२.२०१९